# नाव : सौ. राखी रविंद्र डखरे

## भाग्यलक्ष्मी महिला बचत गट जरूड, ता. वरूड




नमस्कार, मी सौ. राखी रविंद्र डखरे, भाग्यलक्ष्मी महिला बचत गटाची सदस्य असुन रा. जरूड, ता. वरूड येथील रहिवासी आहे. माझ्या गावातील जास्तीत जास्त महिला या घरघुती छोटे–मोठे व्यवसाय करणाऱ्या, व्यवसायातुन मिळणारे पैसे घरातच खर्च करायच्या बचत करणे माहित होते पण बॅकेमध्ये जाणुन वेळ कशाला घालवायचा या मानसिकतेच्या, अशातच आमच्या गावामध्ये नाबार्ड योजनेअंतर्गत नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी महिला बचत गटाविषयी माहिती दिली. आम्ही १४ महिलांनी एकत्र येवुन आमचा महिला बचत गट तयार केला. बचत गटामुळे माझ्या गावांतील छोटया व्यावसायिक महिलांना बॅकेत न जाता बचत करणे तसेच अति मागासलेल्या काही अशिक्षित महिलांना सुध्दा बचत करणे सोपे झाले. या बचत गटाच्या माध्यमातुन सर्वात चांगला फायदा झाला तो म्हणजे शौचालयाचा.

बचत गटाच्या माध्यमातुन नाबार्ड योजने अंतर्गत नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी गावामध्ये अनेक योजना आणल्या तसेच स्वच्छतेसाठी, शौचालयाकरीता जनजागृती कार्यक्रम सुध्दा घेतले. शौचालय या विषयावर जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातुन मला शौचालय बांधकामाकरिता नाबार्ड अंतर्गत नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातुन मिळणाऱ्या अर्थसहाय्याबद्दल कळले. मी लगबगीने कर्जप्रकरणाकरीता लागणारे कागदपत्रे तयार केली माझ्या

सोबतच माझ्या गटातील आणि ४ महिलांना देखील तयार केले आणि संस्थेकडे कर्ज प्रकरण सादर केले. आम्हाला ८ दिवसाच्या आत संस्थेकडून रू. १००००/— अर्थसहाय्य मिळाले हयात जवळचे रू. ४०००/— टाकुन मी माझ्या घरी ८ दिवसात शौचालय बांधुन घेतले.

माझ्या घरच्या परिस्थितीचा विचार केला असता मला गरज असुनही माझ्याकरीता व माझ्या परिवाराकरीता शौचालय बनविणे अतिशय अवघड वाटत होते. पाच सदस्यांच्या कुटुंबाचा आधार म्हणजे माझे पती, एकटया माणसाच्या मिळकतीवर घरखर्च करून शौचालय बांधकामावर खर्च करणे जरा कठीनच होते. परंतु महिला बचत गटाच्या माध्यमातुन मी माझ्या घरी शौचालय बनविले याचा मला अभिमान आहे. शौचालयामुळे माझ्या घरी आरोग्यवर होणारा खर्च कमी झाला. शौचास बाहेर उघडयावर जाण्याचा वेळ वाचला बाहेर शौचास जावे लागत असल्याने शौचास जातांना विचार करावे लागायचे त्यामुळे पोटाचे विकार होत होते. परंतु शौचालय तयार केल्याने तो देखील त्रास वाचला.